NEWSLETTER

Shri Siddhagiri - Krishi Vigyan Kendra

Promoting Organic Farming

श्री सिध्दगिरी – कृषि विज्ञान केंद्र, कणेरी, ता. करवीर, जि. कोल्हापूर – ४१६२३४ महाराष्ट्र.

Shri Siddhagiri -Krishi Vigyan Kendra, Kaneri, Tal. Karveer, Dist. Kolhapur - 416234

अनुक्रमणिका

- प्रस्तावना – कृषी विज्ञान केंद्र
- आद्यारेखा पिक प्रात्यक्षिक
- तंत्रज्ञानाचे प्रक्षेत्र चाचणी पिक कार्यक्रम
- प्रशिक्षण कार्यक्रम
- जुन महिन्यातील कृषी कार्य व सल्ला
- ऊस, भात, सोयाबीन, भुईमूग, नाचणी
- वांगी, टोमॅटो, भेंडी, मिरची
- जनावरांची घ्यावयाची काळजी
- विविध प्रक्रियायुक्त पदार्थ
- कृषक नवोत्थान २०२०
- प्रकाशन
- सामाजिक माध्यमे

संपादकीय मंडळ

मुख्य संरक्षक

प. पु. काडसिद्धेश्वर स्वामीजी

चेअरमन-श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र, कणेरी

मुख्य सल्लागार व मार्गदर्शक

डॉ. लाखन सिंह

निर्देशक, भा.कृ.अनु.प. अटारी, पुणे

मुख्य संपादक

डॉ. रविंद्र सिंह

वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

संपादक

श्री. सुनील कुमार

विषय विशेषज्ञ, कृषी विस्तार

सह–संपादक

श्री. पांडुरंग काळे (विषय विशेषज्ञ, कृषी विद्या)

श्री. राजेंद्र वावरे (विषय विशेषज्ञ, मृदा शास्त्र)

कु. प्रतिभा ठोंबरे (विषय विशेषज्ञ, गृह विज्ञान)

डॉ. चंद्रकांत धानडोरे (विषय विशेषज्ञ, पशुवैद्यकी)

डॉ. पराग तुरखडे (विषय विशेषज्ञ, पिक संरक्षण)

डिजाईन

श्री. विठ्ठल मुठाळ

(कार्यक्रम सहाय्यक कॉम्प्युटर)

प्रकाशक

जगताप प्रिंटर्स, कोल्हापूर.

संदेश

विगत वर्षों में कृषि विज्ञान केंद्रों पर किसानों का विश्वास बढा है, जो कि जिले के कृषि एवं ग्रामीण विकास में किसानों एवं दुसरे विभागों के साथ मिलकर काम कर रहे हैं। इस परिप्रेक्ष्य में श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापुर, विशिष्ठ कार्यों के लिए पुरे देश में एक अमिट छाप छोड़ेगा। केंद्र ने राष्ट्रीय स्तर पर नवचारी कृषक सम्मलेन आयोजित किया, जिसमें देश भर के १०० से अधिक नवाचार अभ्यासित किसान शामिल हुए और अपने अनुभवों को सभी के साथ साझा किया। इस केंद्र के जैविक कृषि के क्षेत्र में किये गए प्रयास जिसमें देसी गायों की गौशाला एवं गोसंवर्धन के प्रयास ग्रामीण एवं राष्ट्रीय स्तर पर सराहनीय एवं प्रेरणादायी हैं। ग्रामीण महिलाओं एवं युवकों के लिए विभिन्न मूल्यवर्धन व् खाद्य प्रसंस्करण प्रशिक्षणों के माध्यम से ग्रामीण स्तर पर रोजगार की संभावनाओं को भी बढ़ावा दिया है, जिसमें कृषि विज्ञान केन्द्र के द्वारा 52 विभिन्न खाद्य पदार्थों का विमोचन भी शामिल है| विभिन्न क्षेत्रों में उद्यमिता विकास के अवसरों का निर्माण करके किसानों, महिलाओं एवं ग्रामीण युवकों के लिए विपणन के क्षेत्र में आर्थिक विकास का मॉडल प्रदान किया है |पोषण सुरक्षा को ध्यान में रखते हुए, गांवो में विभिन्न पोषण बाग बनाये गए हैं |मैं ऐसी आशा करता हूं कि यह समाचार पत्रिका किसानों के लिए एक सूचना तंत्र का काम करेगी|- **डॉ. ए. के. सिंह (उप-महानिदेशक-कृषि प्रसार), भा.कृ.अनु.प., नई दिल्ली**

चेअरमन का संदेश

भारतीय कृषि ने सदैव विश्व कल्याण तथा लोगों के भरण पोषण के दायित्व का निर्वहन बहुत ही कुशलतापूर्वक किया है। विगत वर्षों में रासायनिक उर्वरको एवं कीटनाशको के अनियंत्रित प्रयोग ने मृदा की भौतिक एवं रासायनिक गुणधर्मो का क्षय किया है। यह कृषि विज्ञान केंद्र भारत में जैविक कृषि के क्षेत्र में कार्य करने के लिए पूर्णतय समर्पित एंव संकल्पित है। यह केंद्र किसानों को तकनीकी एवं आर्थिक रूप से सशक्त करने के लिए विभिन्न क़िस्मों के प्रक्षेत्र प्रदर्शन, किसानो, महिलांओ, ग्रामीण युवक एवं विभिन्न विस्तार कर्मचारियों के लिए प्रशिक्षण कार्यक्रम तथा इंटरनेट आधारित विभिन्न उपक्रमों जैसे मोबाइल, यूट्यूब तथा अन्य माध्यमों द्वारा उपयुक्त सलाह एंव सूचनाओं का प्रचार एवं प्रसार कर रहा है। इसी क्रम में किसानों तक सही कृषि आधारित सूचनाएं पहुंचाने के लिए श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र के प्रथम समाचार पत्रिका का प्रारंभ किया जा रहा है। मै अपेक्षा करता हूँ कि श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र का यह प्रयास अपने मुलभुत उद्देश्य की पूर्ति करेगा एवं किसानों के कल्याण तथा ग्रामीण विकास में अपने विभिन्न कार्यक्रमों के माध्यम से विकास का एक पथ प्रदान करेगा- **प.पु. काडसिद्धेश्वर स्वामीजी, चेयरमैन, श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापुर**

निदेशक के शब्द

नवनिर्मित श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापुर को मैं सहृद बधाई देता हूँ कि एक साल की अल्पावधि में कोल्हापुर जिले में कृषि एवं ग्रामीण विकास के क्षेत्र में एक सार्थक बदलाव को दर्शाया है, जिससे राज्य एवं राष्ट्रीय स्तर पर भी अपनी पहचान बनाई है| कृषि विज्ञान केंद्र के उद्देश्यों को ध्यान में रखते हुए, आपके प्रक्षेत्र पर विकसित किये गए विभिन्न प्रात्यक्षिक मॉडल एक सराहनीय कदम है|कोविड-19 की इस विषम परिस्थिथि में भी किसानों को कृषि एवं पशु संबंधित बहुमूल्य सलाह आपके केंद्र से दी गई हैं| आपके इन सार्थक प्रयासों के लिए मैं प.पु.काडसिद्धेश्वर स्वामी जी (चेयरमैन) व् कृषि विज्ञान केंद्र की पूरी टीम को बहुत बधाई देता हूँ और आपके प्रथम केवीके समाचार पत्रिका के प्रकाशित होने से किसानों के लिए उचित सलाह मिले, ऐसी कामना करता हूँ- **डॉ. लाखन सिंह, भा.कृ.अनु.प.-अटारी, पुणे**

दो शब्द

कृषि विज्ञान केंद्र जिल्हा स्तर पर नई तकनीकियों को किसानों तक पहुंचाने एवं उनकी समस्याओं का समाधान करने का उचित माध्यम है। श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र जैविक कृषि के प्रचार व प्रसार में अपनी अहम भूमिका निभा रहा है। जिसमें किसानों को कृषि सामग्री, जैविक कीटकनाशक एवं कृषि उत्पादकों की उचित विपणन करने के मुख्य कार्य में सहायक है। मैं आश्वत करना चाहता हुं कि श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र सभी की आशाओं पर खरा उतरेगा।

डॉ. रविंद्र सिंह, वरिष्ठ वैज्ञानिक एवं प्रमुख, श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कोल्हापुर

❊ अधिक माहितीसाठी संपर्क ❊

वरिष्ठ वैज्ञानिक एवं प्रमुख, श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कणेरी, कोल्हापूर – ४१६२३४ (महाराष्ट्र)

फोन नं. : ०२३१-२९८०००१, ई-मेल : kvkkolhapur2@gmail.com वेबसाईट : Https://kvkkolhapur2.icar.gov.in

कृषी विज्ञान केंद्र : आदेश आणि कार्य

कृषी विज्ञान केंद्र (के.व्ही. के.) भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने(आय.सी.ए.आर.) पुरस्कृत केलेले कृषी विज्ञान केंद्र यामध्ये शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांचे आत्मानिर्बल सशक्तीकरण करण्यासाठी विविध कौशल्य विकास व तंत्राद्यान विकसीत करणे व कृषी प्रदर्शनाद्वारे अद्यावत तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांपर्यंत प्रचार व प्रसार करणे. शेतकरी, महिला, ग्रामीण युवक, सुशिक्षित बेरोजगार, कृषीमित्र, विस्तार कार्यकर्ते इ. लोकांना प्रशिक्षण देणे. कृषीविषयक सल्ला देणे, माहिती देणे, निविष्ठा उपलब्ध करून देणे, कृषी संबधित क्षेत्रातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी उच्च तंत्रज्ञान उपलब्ध करणे. तसेच कृषी हवामान विषयक हंगामानुसार शेतकर्यांना पिकांविषयी मार्गदर्शन करणे आणि शेती पूरक व्यवसायाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या हेतूने प्रयत्न करणे. पशूच्या आरोग्यासाठी , प्रजननासाठी, दुध उत्पन्न वाढीसाठी, आरोग्य शिबिरे, लसीकरण, जंत निर्मुलन कार्यक्रम राबविणे. या कृषी विज्ञान केंद्राने विशेष करून सेंद्रीय शेतीवर लक्ष्य केंद्रित केले आहे. सेंद्रीय शेतीच्या आधारे बियाणे पेढी(सेंद्रीय बियाणे) उपलब्ध केली आहे. शेतकरी आत्मनिर्बल होण्यासाठी विविध प्रकारच्या शेती पद्धती, अद्यावत सेंद्रीय निविष्ठा आणि त्यासाठी लागणारे मार्गदर्शन, प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे काम केले जाते.

अधिकार क्षेत्रे :

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने(आय.सी.ए.आर.) ने पुरविल्याप्रमाणे आम्ही कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, भुदरगड, गढहिंग्लज, आजरा, चंदगड या ०६ तालुक्यामध्ये काम करीत आहोत.

कार्य :

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्या निर्देश्यानुसार खालील कृषी विज्ञान केंद्रासाठी निश्चित करण्यात आली आहेत.

- शाश्वत पिक पद्धतीमध्ये स्थळनिहाय योग्य तंत्रज्ञान निवडून प्रक्षेत्र चाचणी पिक कार्यक्रम राबविणे. (तंत्रज्ञान व मूल्यमापन शुद्धता तपासणी)
- विविध शेती व्यवस्थेखालील कृषी तंत्रज्ञानाच्या स्थान विशिष्टतेचे मुल्यांकन करण्यासाठी शेतीवरील चाचणी.
- शेतकऱ्यांच्या शेतावर तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी अग्रारेखा पिकप्रात्याक्षिकाचे आयोजन करणे.
- शेतकरी, महिला , ग्रामीण युवक, सुशिक्षित बेरोजगार, कृषी मित्र, विस्तार कर्मचाऱ्यांचे आधुनिक तंत्रज्ञानाविषयीचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण देणे.
- जिल्ह्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक, खाजगी आणि स्वयंसेवी संस्था इ. च्या उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी शेती तंत्रज्ञानाचे ज्ञान व संशोधन केंद्र म्हणून काम करणे.
- शेतकऱ्यांच्या आवडीच्या विषयावर आणि इतर माध्यमांचा वापर करून शेती सल्ला देणे.

आद्यारेखा पिक प्रात्यक्षिक आणि तंत्रज्ञानाचे प्रक्षेत्र चाचणी पिक कार्यक्रम :

कृषी शास्त्रज्ञाच्या सखोल मार्गदर्शनाखाली नव्याने प्रसारित झालेल्या सिद्ध तंत्रज्ञानाची प्रथम शेतकऱ्याच्या शेतावर घेण्यात आलेल्या प्रात्याक्षिकाना कार्यक्रम असे संबोधले जाते. सदरील प्रात्यक्षिके संबधित विषय विशेषज्ञाच्या मार्गदर्शनाखाली राबविली जातात. नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी कितपत उपयोगी आहे हे पडताळण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या क्षेत्रावर तसेच शेतकऱ्याच्या प्रक्षेत्रावर तंत्रज्ञान राबविण्यामध्ये त्रुटी आढळयास सदरील तंत्रज्ञान शुद्धता तपासणी शेतकऱ्यांच्या शेतावर किंवा कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर केली जाते.

प्रशिक्षण केंद्रे आणि शेतकरी मेळावा :

केव्हीके शेतकरी, शेती महिला, ग्रामीण युवक व विस्तार कार्यकर्ते त्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि वृद्धीमध्ये बदल करून त्यांना विविध दीर्घ आणि आपत्कालीन व्यवहारिक, स्वयंरोजगार आधारित प्रशिक्षण देण्यात येते. हे विद्यमान आणि नाविन्यपूर्ण शेती पद्धतीच्या विविध पैलूंवर, सेंद्रीय, परंपरागत शेती, लघु कृषी उपक्रमांचे विविध विषय आणि त्यांच्या उत्पन्नाची वाढ आणि त्यांना स्वतंत्र बनविण्यासाठी संबधित कार्याकालापांचे प्रशिक्षण देते. शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्यासाठी मेळावा आयोजित केला जातो.

विस्तार कार्यक्रम :

केव्हीकेमध्ये विविध प्रकारच्या चाचणी(माती, आरोग्य) व विविध शेती पद्धती दर्शविण्यासाठी विस्तार कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. शेतकरी मेळावा, कृषी तंत्रज्ञान महोत्सव, एक्स्पोसार व्हिजीट, प्रक्षेत्र दिवस, गरजेनुसार शेती सल्लागार, गट चर्चा, कृषी प्रदर्शन, टी.व्ही. वार्ता, रेडीओ वार्ता, प्रकाशन इ.

आद्यारेखा पिक प्रात्यक्षिक :

कृषी शास्त्रज्ञाच्या सखोल मार्गदर्शनाखाली नव्याने प्रसारित झालेल्या सिद्ध तंत्रज्ञानाची प्रथम शेतकऱ्याच्या शेतावर घेण्यात आलेल्या प्रात्याक्षिकाना कार्यक्रम असे संबोधले जाते. सदरील प्रात्यक्षिके संबधित विषय विशेषज्ञाच्या मार्गदर्शनाखाली राबविली जातात.

अ.क्र	पिक / उपक्रम	आद्यारेखा पिक प्रात्यक्षिक
१.	सोयाबीन	सोयाबीन उत्पादकता वाढविण्यासाठी सोयाबीनच्या सुधारित वाणाचा (फुले संगम (केडीएस-७२६)) वापर
२.	भात	भाताची उत्पादकता वाढविण्यासाठी फुले समृध्दी वाणाचा वापर
३.	सोयाबीन	सोयाबीन पिकामध्ये उत्पादकता वाढविण्यासाठी जीवाणू खते व माती आधारित खत व्यवस्थापन
४.	सोयाबीन	सोयाबीनवरील पाने खाणाऱ्या अळयांचे व्यवस्थापन
५.	संकरीत नेपियर	संकरीत नेपियर(फुले गुणवंत) चे प्रात्यक्षिक
६.	ज्वारी	खरीप हंगामातील बागायती क्षेत्रात मल्टीकट ज्वारी सीओएफएस -२९ ची ओळख
७.	धान्य	धान्य साफ करण्यासाठी स्पायरल सेपरेटरचे प्रात्यक्षिक
८.	सोयाबीन	सोयाबीन काढणीसाठी सुधारित हात मोज्यांची कार्यक्षमता पाहणे
९.	औजारे	गुरांचे दुध काढताना फिरती घडवंची व तिपाईची कार्यक्षमता पाहणे

वर्ष २०१९-२० ची आद्यारेखा पिक प्रात्यक्षिके

भाताची उत्पादकता वाढविण्यासाठी फुले समृध्दी वाणाचा वापर
गाव: भादवणवाडी , ता. आजरा

खरीप हंगामातील बागायती क्षेत्रात मल्टीकट ज्वारी सीओएफएस - २९ ची ओळख
गाव. हणमंतवाडी, ता. गडहिंग्लज

सोयाबीन पिकामध्ये उत्पादकता वाढविण्यासाठी जीवाणू खते व माती आधारित खत व्यवस्थापन
गाव. हणमंतवाडी, ता. गडहिंग्लज

सोयाबीन उत्पादकता वाढविण्यासाठी सोयाबीनच्या सुधारित वाणाचा (फुले संगम (केडीएस-७२६)) वापर
गाव: शेंडूर , ता. कागल

तंत्रज्ञानाचे प्रक्षेत्र चाचणी पिक कार्यक्रम :

नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी कितपत उपयोगी आहे हे पडताळण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या क्षेत्रावर तसेच शेतकऱ्याच्या प्रक्षेत्रावर तंत्रज्ञान राबविण्यामध्ये त्रुटी आढळयास सदरील तंत्रज्ञान शुद्धता तपासणी शेतकऱ्यांच्या शेतावर किंवा कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर केली जाते.

अ.क्र	Crop/Enterprise	तंत्रज्ञान चाचणी
१.	नाचणी (खरिफ)	नाचणीच्या स्थानिक जातीच्या तुलनेत फुले नाचनी व केओपीएन-२ च्या नवीन जातीचे मूल्यांकन करणे
२.	ऊस *(उन्हाळी)*	सुरू ऊस / रतुन ऊस मधील उन्हाळी मुगबीजच्या आंतरपीकांचे मूल्यांकन करणे
३.	नाचणी *(खरिफ)*	नाचणी पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी २% १९:१९:१९ एन.पी.के. ची फवारणी व एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन
४.	सोयाबीन *(खरिफ)*	सोयाबीन मध्ये पॉ
५.	ऊस *(खरिफ)*	ऊसावरील हुमणी अळीचे व्यवस्थापन
६.	कुक्कुटपालन *(खरिफ)*	परसातील कुक्कुटपालनामध्ये काळ्या ऑस्ट्रेलॉर्प जातीच्या कोंबडीचे मूल्यांकन करणे
७.	प्रो-बायोटिक	गायींसाठी प्रो-बायोटिकचा वापर
८.	पोषण	पूर्व शालेय मुलांमधील कुपोषणावर मात करण्यासाठी उर्जा आणि प्रथिनेयुक्त सोयाणेच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन
९.	ज्वारी	धान्य साठवणी दरम्यान कीटकांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुपर ग्रेन बॅगच्या परिणामाचे मूल्यांकन

वर्ष २०१९-२० चे प्रक्षेत्र चाचणी पिक कार्यक्रम

पूर्व शालेय मुलांमधील कुपोषणावर मात करण्यासाठी उर्जा आणि प्रथिनेयुक्त सोयाणेच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन
गाव: शेंडूर , ता. कागल

नाचणीच्या स्थानिक जातीच्या तुलनेत फुले नाचनी व केओपीएन-२ च्या नवीन जातीचे मूल्यांकन करणे
गाव. बेडिव, ता. भुदरगड

नाचणी पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी २% १९:१९:१९ एन.पी.के. ची फवारणी व एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन
गाव. हणमंतवाडी, ता. गढहिंग्लज

उसावरील हुमणीचे व्यवस्थापन
गाव. तुर्केवाडी, ता. चंदगड

प्रशिक्षण कार्यक्रम :

i) शेतकरी व शेतकरी महिला

अ.क्र	महिना	प्रशिक्षण कार्यक्रम (On Campus)
१.	जून-२०	सोयाबीनमधील एकात्मिक पिक व्यवस्थापन
२.	जून-२०	नाचणी पिकातील सुधारित पिक व्यवस्थापन तंत्रज्ञान
३.	जून-२०	भाजीपाला पिकांमध्ये जैविक कीटक व रोगांचे व्यवस्थापन
४.	जून-२०	सोयाबीन पिकामधील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन
५.	जून-२०	पावसाळयात जनावरांची घ्यावयाची काळजी
अ.क्र	**महिना**	**प्रशिक्षण कार्यक्रम (Off Campus)**
१.	जून-२०	सोयाबीनमधील एकात्मिक पीक व्यवस्थापन
२.	जून-२०	बाजरीमध्ये सुधारित पीक व्यवस्थापन तंत्रज्ञान
३.	जून-२०	भातामधील एकात्मिक कीटकांचे व्यवस्थापन
४.	जून-२०	सोयाबीनमधील एकात्मिक कीड व्यवस्थापन
५.	जून-२०	प्रमुख खरीप पिकांमध्ये माती चाचणी आधारित खत व्यवस्थापन
६.	जून-२	जैविक खते वापरण्याबाबत जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम
७.	जून-२०२०	हवामान बदल आणि त्याचा शेतीवर होणारा परिणाम

ii) ग्रामीण तरुणांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम

अ.क्र	महिना	प्रशिक्षण कार्यक्रम
१.	जून-२०	भात व सोयाबीनचे बीज उत्पादन तंत्र

iii) विस्तार कार्य करणाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

अ.क्र	महिना	प्रशिक्षण कार्यक्रम
१.	जून-२०	कमी किंमतीमध्ये पौष्टिक आहाराचे नियोजन

वर्ष २०१९-२० चे प्रशिक्षण कार्यक्रम

वर्ष २०१९-२० चे विस्तार कार्यक्रम

जून महिन्यातील कृषी कार्य व सल्ला

पिक : ऊस

लागवडीचा हंगाम: आडसाली जून - जुलै

वाणाची निवड: को-८६०३२, कोएम-२६५ , एम. एस.- १०००१, को-९२००५

लागवड तंत्र: उसाच्या लागवडीसाठी मध्यम जमिनीत १०० ते १२० से.मी. व भारी जमिनीसाठी १२० ते १५० सेमी अंतरावर सरी काढावी. ऊसाच्या लागवडीसाठी एक डोळा किंवा दोन डोळ्याची टिपरे वापरावीत. एक डोळा पद्धतीने डोळा वरच्या बाजूस ठेवून ३० सेमी. अंतरावर लागण करावी. दोन डोळ्यांची टिपरी वापरायची असल्यास दोन टिपऱ्यामधील अंतर १० ते २० सेमी. ठेवावे.

बीजप्रक्रिया:

ऊस बियाणे लावणीपूर्वी १० लिटर पाण्यात डायमेथोएट ३०% प्रवाही २६.५ मि.ली. + १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० मिनिटासाठी बेणेप्रक्रिया करावी. यामुळे बुरशीजन्य रोग व खवले किडीची बंदोबस्त होतो.

हुमनीचा प्रादुर्भाव असल्यास बीज प्रक्रीयेसाठी इमिडॅक्लोप्रीड ५ ग्रॅम प्रती १० ली. पाणी वापरून १० मिनिटे बिजप्रक्रिया करावी.

ॲसिटोबॅक्टर आणि स्पुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात उसाच्या टिपऱ्या ३० मिनिटे बुडवून नंतर लावण करावी.यामुळे नत्र खतामध्ये ५०% ची तर स्पुरद खतामध्ये २५ टक्के बचत होते.

आंतरपिके:

आडसाली ऊसामध्ये सोयाबीन, भुईमुंग, चवळी, व भाजीपाला इ. पिके घ्यावी.

खत व्यवस्थापन:

आडसाली ऊसासाठी ३० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा गांडूळ खत ५ टन प्रती हेक्टरी लागवडीपूर्वी दुसऱ्या नांगरणीच्या वेळी अर्धी मात्रा व उरलेली अर्धी मात्रा सरी सोडण्यापूर्वी द्यावी.

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

शेतात प्रकाश सापळा लावून हुमणीचे व्यवस्थापन करावे.

सुरवातीचे हुमणीचे नियंत्रण करण्यासाठी फिप्रोनील ४०% + इमिडाक्लोप्रीड ४०% या मिश्र किटकनाशकाची १५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी.

पोक्का बोईंग या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कार्बेडाझिम या बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात फवारणी करावी.

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):

शेतात प्रकाश सापळा लावून हुमणीचे व्यवस्थापन करावे.

सुरवातीचे हुमणीचे नियंत्रण करण्यासाठी मेटारीझींअम अनिसोप्ली १५ किलो किंवा हेटेरोऱ्हाबडीटीसं इंडिका ७ किलो प्रती हेक्टर या जैविक किटकनाशकाची आळवणी करावी.

पिक : भात

पेरिणीची वेळ: टोकण व पेरणीकरिताभातपिकाची पेरणी १ जुन ते २१ जुन याकालावधीत करावी.

बियाणे: पुनर्लागवड पद्धतीसाठी हेक्टरी ३० ते ४० किलो, पेरणी पद्धतीसाठी ७५ ते १०० किलो व टोकन पद्धतीसाठी ५० ते ६० किलो बियाणे वापरावे. संकरीत जातीकरिता हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे.

पेरणीचे आंतर: टोकनिकारिता हळव्या वानामध्ये १५ * १५ सेमी, निमगरव्या, गरव्या किंवा संकरीत वानामध्ये २० * १५ सेमी वर करावी. पेरणी पद्धतीत २२.५ सेमी अथवा ३० सेमी अंतरावर पेरणी करावी.

पुनर्लागवड: रोपांच्या पुनर्लागवडी पूर्वी पारंपारिक पद्धतीने किंवा यंत्राच्या सहायाने चिखलणी करावी. हळव्या जातीची पुनर्लागवड पेरणीनंतर २१– २५ दिवसांनी, निमगरव्या जातीची २३ ते २७ दिवसांनी व गरव्या जातीची २५ ते ३० दिवसांनी करावी. एका चुडात २ ते ३ रोपे ठेवावीत. संकरीत जातींसाठी एका चुडात १ ते २ रोपे ठेवावीत. योग्य वयाच्या रोपांची पुनर्लागवड हळव्या वानामध्ये १५ * १५ सेमी, निमगरव्या, गरव्या किंवा संकरीत वानामध्ये २० * १५ सेमी वर करावी.

आंतरपिके: पेरणी पद्धतीने भाताची लावण केल्यास त्यामध्ये घेवडा, सोयाबीन, ताग यासारखी आंतरपिके घेता येतात.

तण नियंत्रण:

•पेरणी व टोकणी पध्दतीने लावणी केल्यास आवश्यकतेनुसार कोळपणी करून तणाचा बंदोबस्त करावा.

•लावणींनंतर भात खाचरामधे ५-६ सेमी पाणी ठेवल्यास तणाचा प्रादुर्भाव कमी दिसून येतो.

•पेर भात शेतमध्ये प्रभावी तण नियंत्रण व आर्थिक फायद्यासाठी पेरणीनंतर दोन ते तीन दिवसांनी ६४० मि.ली. ऑक्झिफ्लुरोफेन २२.५ ई.सी. (०.१५० किलो क्रियाशील घटक) प्रती हेक्टरी आणि पेरणीनंतर २५ दिवसांनी मेटसल्फ्युरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरीम्युरॉन ईथाईल १०

टक्के याचे२० ग्रॅम विद्राव्य तयार मिश्रण (०.००४ किलो क्रियाशील घटक) प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

•पुनर्लागवडीनंतर १५-२० दिवसांनी मेटसल्फुरॉन मिथाईल १०टक्के + क्लोरीम्युरॉन ईथाईल १० टक्के याचे २० ग्रॅम विद्राव्य तयार मिश्रण (०.००४ किलो क्रियाशील घटक) प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे आणि ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी.

रोपवाटिका व्यवस्थापन:

रोपवाटिकेसाठी वाफे तयार करताना १ गुंठा क्षेत्रात २५० किलो शेणखत किंवा कंपोस्ट खत व १ किलो युरिया खत चांगल्या प्रकारे मातीत मिसळावे.

रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रती गुंठा ५०० ग्रॅम नत्र द्यावे.

भात लागवडीच्या जमिनीमध्ये चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १० टन याप्रमाणात जमिनीत मिसळावे.

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

भातावरील महत्वाच्या किडी उदा. खोडकिडा, सुत्रकृमी जमिनीमध्ये तसेच मागील पिकाच्या अवशेषांमध्ये आश्रय घेतात म्हणून लागवडी पूर्वी पिकाचे अवशेष वेचून करावे.

रोग प्रतिकारक्षम व कीडरोगमुक्त वाणाची निवड करावी आभासमय काजळी रोगाचे संक्रमण रोखण्यासाठी बियाण्याला २% (१० लिटर पाणी + २० ग्रॅम मीठ) मिठाची प्रक्रिया करावी. या द्रावणात तरंगणारे बियाणे काढून नष्ट करावे.

रोपअवस्थेमध्ये पावसाचा खंड पडल्यास लष्करी अळीच्या प्रादुर्भावाची शक्यता असते म्हणून अश्यावेळी व्यवस्थापनासाठी रोपवाटिकेत मोकाट पाणी सोडावे.

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):

भातावरील महत्वाच्या किडी उदा. खोडकिडा, सुत्रकृमी जमिनीमध्ये तसेच मागील पिकाच्या अवशेषांमध्ये आश्रय घेतात म्हणून लागवडीपूर्वी पिकाचे अवशेष वेचून नष्ट करावे.

रोग प्रतिकारक्षम व कीडरोगमुक्त वाणाची निवड करावी आभासमय काजळी रोगाचे संक्रमण रोखण्यासाठी बियाण्याला २% (१० लिटर पाणी + २० ग्रॅम मीठ) मिठाची प्रक्रिया करावी. या द्रावणात तरंगणारे बियाणे काढून नष्ट करावे.

रोपअवस्थेमध्ये पावसाचा खंड पडल्यास लष्करी अळीच्या प्रादुर्भावाची शक्यता असते म्हणून अश्यावेळी व्यवस्थापनासाठी रोपवाटिकेत मोकाट पाणी सोडावे.

पिक : सोयाबीन

पेरणीची वेळ: जूनच्या पहिल्या पंधरवड्यात वापश्यावर पेरणी करावी.

बियाणे: पेरणीसाठी ७५-८० किलो प्रती हेक्टरी टोकन करण्यासाठी ४५-५०किलो प्रती हेक्टरी बियाणे वापरावे

पेरिणीचे अंतर:भारी जमिनीत पेरणी ४५*१५ सेमी अंतरावर करावी व मध्यम जमिनीत पेरणी ३०*१० सेमी अंतरावर करावी

सुधारित वाण: फुले संगम, फुले किमया, फुले अग्रणी

तण नियंत्रण:पेरणीच्या वेळी प्रती हेक्टरी पेंडीमेथलीन १.०-१.५ किलो क्रियाशील घटक ६००-७०० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी. पीक उगवणींनंतर २१ दिवसांनी प्रती हेक्टरी इमझेथायपर क्रियाशील घटक ०.१-०.१५ किलो ५००-६०० लिटर पाण्यात मिसळून तनाणवर फवारणी करावी.

खत व्यवस्थापन:

चांगले कुजलेले शेणखत/ कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन पेरणीपूर्वी जमिनीत मिसळावे.

नत्र स्थिरीकरणासाठी सोयाबीन गटाचे रायझोबियम २५० ग्रॅम व स्फुरद विरघळविणारे जीवाणू २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यात बीज प्रक्रिया करावी.

सोयाबीन पिकास हेक्टरी ५० किलो नत्र (युरिया-१०८.५ किलो) ७५ किलो स्फुरद (सिंगल सुपर फोस्फेट-४६९ किलो) व ४५ किलो पालाश (प्यु. ओ.पी.-७५ किलो) पेरणीच्या वेळी द्यावे.

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

लागवडीसाठी रोग प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी.

खराब झालेल्या आणि तडा गेलेल्या बियाण्यांचा वापर टाळावा.

खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायोमेथॉक्सम ३० एफएस @ १० मिली /कि. ची बीजप्रक्रिया करावी

पिकाला कॉलर रॉट, चारकोल रॉट व इतर रोपांच्या रोगापासून बचाव करण्यासाठी कार्बोक्झीन ३७.५ + थायरम ३७.५% डब्ल्यूएस @ २.२ग्रॅम /कि बियाणे या प्रमाणात बीज प्र या करावी.

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):

लागवडीसाठी रोग प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी

खराब झालेल्या आणि तडा गेलेल्या बियाण्यांचा वापर टाळावा

पिकाला कॉलर रॉट, मुळकुज किंवा खोडकुज व इतर रोपांच्या रोगापासून बचाव करण्यासाठी ट्रायकोडर्मा ५ग्रॅ/ कि बियाण्यासह बीजप्रक्रिया करावी

पेरणीच्या वेळी मका किंवा ज्वारीची ५% बियाणे सोयाबीनच्या बियाण्यामध्ये मिसळल्यास पिकाच्या वाढीच्या काळात पक्षी थांबे म्हणून उपयोगी येतात.

पिक : भुईमूग

पेरिणीची वेळ: १५जून ते १५ जुलै या कलावधीत करावी.
बियाणे: भुईमूगचे वाणनिहाय बियाणे प्रती हेक्टरी
१०० किलो- एसबी-११, टीएजी-२४, जेएल-५०१, फुले-६०२१, १२०-१५०किलो- फुले प्रगती, फुले व्यास, फुले उनप, फुले भारती.
पेरिणीचे अंतर: दोन ओळीतील अंतर ३० सेमी आणि दोन रोपातील अंतर १० सेमी ठेवावे.
आंतरपिके: खरीप भुईमूंग पिकात सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, मूग, उडीद ही आंतरपिके' ६:२ या प्रमाणात घ्यावेत.
तण नियंत्रण: भुईमूगतील कार्यक्षम तण व्यवस्थापनाकरीता पेरणीनंतर लगेच पेंडीमिथालिन
१.०० किलो क्रियाशील घटक प्रती हेक्टरी ६००-७०० लिटर पाण्यातून ओलीवर फवारणी करावी. तसेच पेरणीनंतर २०-२५ दिवसांनी परसूट किंवा टारगासुपर १५ मिली व्यापारी उत्पादन प्रती हेक्टरी १० लिटर पाण्यातून द्यावे.
पाणी व्यवस्थापन: पावसाने ताण दिल्यास पिकाच्या ह्या अवस्थेत पाणी द्यावे.भुईमुगास फुले येण्याची अवस्था (पेरणीनंतर २०-३० दिवसांनी).
खत व्यवस्थापन:
पूर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या अगोदर प्रती हेक्टरी १० टन कंपोस्ट किंवा चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळून द्यावे.
बियाण्यास २५ ग्राम राझोबियम व २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जीवाणू प्रती किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करून पेरणी करावी.
पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र (युरिया- किलो), ५० किलो स्फुरद (सिंगल सुपर फोस्फेट- किलो) जमिनीत मिसळून द्यावे.(प्रती हेक्टर)
तसेच रासायनिक खतासोबत पेरणीच्या वेळी २०० किलो जिप्सम प्रती हेक्टर द्यावे.
कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):
किडरोग प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी
खराब झालेले आणि फुटलेले बियाण्यांचा वापर टाळावा
मावा व फुलकिडे (थ्रीप्स) व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड (५ ग्रॅम / कि.ग्रा. बियाणे) या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी
टिक्का रोग नियंत्रनासाठी, प्रती किलो बियाण्याला १० मिली स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.५% एएस या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी
नागअळीच्या व्यवस्थापनासाठी सोयाबीनपिकाचा आकर्षक पिक म्हणून लागवड करावी.
कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):
किडरोग प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी
खराब झालेले आणि फुटलेले बियाण्यांचा वापर टाळावा
टिक्का रोग नियंत्रणासाठी, प्रती किलो बियाण्याला १० मिली स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.५% एएस या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी
नागअळीच्या व्यवस्थापनासाठी सोयाबीनपिकाचा आकर्षक पिक म्हणून लागवड करावी.

पिक : नाचणी

पेरिणीची वेळ: १५ जून-१५ जुलै
बियाणे: ३– ४ किलो प्रती हेक्टरी
पेरिणीचे अंतर: दोन ओळीतील अंतर २२.५ सेमी आणि दोन रोपातील अंतर १० सेमी ठेवावे॰
सुधारित वाण: फुले नाचणी, फुले कासारी, दापोली-२
तण नियंत्रण: एक खुरपणी आणि दोन कोळपणी किंवा आयसोप्रोटयुरॉन ५० टक्के या तणनाशकाची प्रती हेक्टरी ७५०ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून पिक व तणे उगवण्यापूर्वी फवारणी करावी.
आंतरपिके :नाचणी पिकामध्ये नाचणी + सोयाबीन , नाचणी + उडीद किंवा नाचणी + मटकी या पिकांची ४:१ किंवा ८:२ याप्रमाणात घ्यावी.
खत व्यवस्थापन:
पेरणीच्या अगोदर हेक्टरी ५ टन शेणखत/कंपोस्ट खत शेतात मिसळून द्यावे.
रोपवाटिका व्यवस्थापन:
रोपवाटीकेसाठी वाफे तयार करताना १ गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत किंवा कंपोस्ट खत व ७.५ किलो सिंगल सुपर फोस्फेट चांगल्याप्रकारे मातीत मिसळावे.
पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास २५ ग्रॅम अझोस्पिरीलम ब्रासिलेन्स आणि अस्परजिलस अवोमोरीया जीवाणू संवार्धाकाची बीजप्रक्रिया करावी.
कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):
लागवडीसाठी रोग प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी
खराब झालेल्या आणि तडा गेलेल्या बियाण्यांचा वापर टाळावा
कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):
लागवडीसाठी रोग प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी
खराब झालेल्या आणि तडा गेलेल्या बियाण्यांचा वापर टाळावा. मित्र कीटकांचे संगोपन करावे

पिक : वांगी

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

किडरोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिकारक्षम वाण / संकरांची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे.

फ्यूझेरियम मर रोग आणि मुळावरीलसूत्रकृमीचा संसर्ग टाळण्यासाठी प्रती किलो बियाण्याला स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.० % डब्ल्यूपी २० ग्रॅम किवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी १.० % डब्ल्यूपी ५ग्रॅम ची प्रक्रिया करावी

तसेच नर्सरी बेडला सुद्धा स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी५० ग्रॅम /चौ.मी. या प्रमाणात प्रक्रिया करावी आणि लावणीपूर्वी ५किलो हेक्टर स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स मातीवर ५ टन कुजलेल्या शेणखतात मिसळून एक हेक्टर क्षेत्रात फेकावे

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):

किडरोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिकारक्षम वाण /संकरांची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे.

फ्यूझेरियम मर रोग आणि मुळावरीलसूत्रकृमीचा संसर्ग टाळण्यासाठी प्रती किलो बियाण्याला स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी २० ग्रॅम किवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी १.० % डब्ल्यूपी ५ग्रॅम ची प्रक्रिया करावी

तसेच नर्सरी बेडला सुद्धा स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी ५० ग्रॅम /चौ.मी. या प्रमाणात प्रक्रिया करावी आणि लावणीपूर्वी ५किलो हेक्टर स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स मातीवर ५ टन कुजलेल्या शेणखतात मिसळून एक हेक्टर क्षेत्रात फेकावे.

पिक : टोमॅटो

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

किडीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिकारक्षम जाती /संकरांची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे.

फ्यूझेरियम मर रोग आणि मुळावरीलसूत्रकृमीचा संसर्ग टाळण्यासाठी प्रती किलो बियाण्याला स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी २०ग्रॅम किवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी १.० % डब्ल्यूपी ९ ग्रॅम ची प्रक्रिया करावी

तसेच नर्सरी बेडला सुद्धा स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी ५० ग्रॅम / चौ.मी. या प्रमाणात प्रक्रिया करावी आणि लावणीपूर्वी ५किलो हेक्टर स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स मातीवर ५ टन कुजलेल्या शेणखतात मिसळून एक हेक्टर क्षेत्रात फेकावे

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):

किडीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिकारक्षम जाती /संकरांची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे.

फ्यूझेरियम मर रोग आणि मुळावरीलसूत्रकृमीचा संसर्ग टाळण्यासाठी प्रती किलो बियाण्याला स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी २०ग्रॅम किवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी १.० % डब्ल्यूपी ९ ग्रॅम ची प्रक्रिया करावी

तसेच नर्सरी बेडला सुद्धा स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.०% डब्ल्यूपी ५० ग्रॅम / चौ.मी. या प्रमाणात प्रक्रिया करावी आणि लावणीपूर्वी ५किलो हेक्टर स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स मातीवर ५ टन कुजलेल्या शेणखतात मिसळून एक हेक्टर क्षेत्रात फेकावे

पिक : भेंडी

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

- रोग प्रतिरोधक वाणाची निवड करावी
- पिकाच्या पेरणीपूर्वी हेक्टरी २ किलोनिंबोळी पेंड आणि ६ किलो ट्रायकोडर्माचा उपयोग करावा
- रस शोषण करणाऱ्या किडीच्या व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड ४५ % एसएफ ५ ग्रॅम / किलो बियाण्याला बीजप्रक्रिया करावी

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रीय):

- रोग प्रतिरोधक वाणाची निवड करावी
- पिकाच्या पेरणीपूर्वी शेतजमिनीमध्ये हेक्टरी २ किलोनिंबोळी पेंड आणि ६ किलो ट्रायकोडर्माचा उपयोग करावा
- मुळांवरील सुत्रकृमी आणि फ्यूझेरियम मर रोगाचा संसर्ग रोखण्यासाठी लागवड करण्यापूर्वी स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १.% डब्ल्यूपी @ २० ग्रॅम /कि.ग्रॅ. या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

पिक : मिरची

कीड व रोग नियंत्रण (रासायनिक):

पिकाला कीड रोगा पासून मुक्त ठेवण्यासाठी प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी.रस शोषण करणाऱ्या किडी उदा. फुलकिडे (थ्रीप्स), पांढरीमाशी, मावा, तुडतुडे इत्यादीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी रोपाची लागवड ४० नायलॉन च्या बंद जाळीमध्ये करावी. रोपे शोषक कीटकांपासून संरक्षणकरण्यासाठी इमिडाक्लोप्रिड ७० डब्ल्यूएस @ १० ग्रॅम / कि.ग्रा. बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी

कीड व रोग नियंत्रण (सेंद्रिय) :

पिकाला कीड रोगा पासून मुक्त ठेवण्यासाठी प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी.रस शोषण करणाऱ्या किडी उदा. फुलकिडे (थ्रीप्स), पांढरीमाशी, मावा, तुडतुडे इत्यादीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी रोपाची लागवड ४० नायलॉन च्या बंद जाळीमध्ये करावी.पानझळ तसेच इतर जमिनीतून १ % डब्ल्यूपी @ ५ ग्रॅम किंवा स्यूडोमोनस फ्लूरोसेन्स १ .०% डब्ल्यूपी @ १० ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बिजप्रक्रिया करावी.

जनावरांची घ्यावयाची काळजी

पशुपालन हा शेतीचा अविभाज्य घटक आहे, प्रत्येक शेतकऱ्याकडे कमी अधिक प्रमाणात पशुधन आहे त्यामध्ये गाई, म्हैस, शेळी, मेंढी, कोंबड्या इ. पशुधन असते, परंतू पावसाळयात जनावरांची काळजी आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

पावसाळयात सर्वसाधारणपणे आढळून येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे:-

छत गळणे:-

गळणाऱ्या गोठ्यातील ओलसर व कोंदट वातावरणामुळे जनावरांच्या प्रजनन वकार्यक्षमतेवर परिणाम होतो.गोठ्यात जर पावसाची झडप येत असेल किंवा छतामधून गोठ्यामध्ये पाणी येत असेल तर जनावर बैचेन होते, पाणी शेन जनावराचे मलमूत्र यामुळे अमोनिया चे प्रमाण वाढते तसेच विषारी वायूंचीनिर्मिती होऊन जनावरांच्या डोळयावर सूज येते, शरीराची आग होऊन खाज सुटते.यामुळे जनावर स्वस्थ राहत नाही.ओलसर वातावरणात विशेषता कोंबड्यामध्येकॉक्सीडायोसीस रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यामुळे गोठा नेहमी स्वच्छआणि कोरडा ठेवावा. शेळया ओलसर जागी बसत नाहीत शेळयामध्ये तणाव दिसून येतो.

खाद्य:-

पावसाळयामध्ये गवताची उगवण क्षमता तसेच वाढ अधिक प्रमाणात असते. या चाऱ्याकडे जनावरे आकर्षित होतात (लापीचे गवत) त्यामुळेजनावरांना खायला पोटभर आणि भरपूर खाद्य मिळते. परंतु हे जनावरांसाठीअपायकारकसुद्धा आहे. पावसाळयात उगवणारे गवत मऊ असल्याने जनावरे कमी वेळातअधिक गवत खातात व कोरडा चारा कमी खातात. पावसाळयात उगवणाऱ्या गवतातपाण्याचे प्रमाण अधिक असते व तंतुमय पदार्थांचे प्रमाण कमी असते त्यामुळेजनावरांची अन्न पचनाची क्रिया बिघडते व जनावरांना हगवण लागते.

खाद्यामध्ये बुरशी होणे:-

जनावरांचे खाद्य जर भिजले तर खाद्यामध्ये बुरशी निर्माण होते, जनावरांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम दिसून येतो त्यामुळे पशुपालकाचे आर्थिक नुकसान होते.

कासेचे आजार:-अस्वच्छ गोठ्यात कासेचे आजार बळावतात, जनावरांना दगडी आजार होतो. दुधाचे उत्पादन कमी होते.

आर्द्रता

पावसाळी वातावरणात आर्द्रता अधिक असल्याने हे वातावरणविविध प्रकारच्या जीवाणू तसेच विषाणूंच्या वाढीस पोषक ठरते व निरनिराळयाजीवाणूंची आणि विषाणूंची झपाट्याने वाढ होऊन जनावरे जीवाणूजन्य वविषाणूजन्य रोगास बळी पडतात.

जंत व माश्यांचा प्रादुर्भाव:-

जीवाणूप्रमाणे कृमींनासुद्धा पावसाळयातील वातावरण पोषक ठरते व परिणामी जनावरे वेगवेगळयाकृमींना बळी पडतात.माश्यांचे प्रमाण वाढते, माशा जनावरांना चावतात जनावर बैचेन होते त्याचा परिणाम दुध उत्पादनावर दिसून येतो.

खुरांचे आजार:-

खुरांमध्ये चिखल राहिल्यामुळे खुरामध्ये जीवाणूंचा प्रादुर्भाव होवून खुरांचे आजार दिसून येतात. काहीवेळेस जनावर लंगडते.

उपाययोजना:-

- पावसाळयात पशुपालकांनी आपल्या जनावरांची काळजी घेणे आवश्यक ठरते.यासाठी खालील गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.
- जनावरांचा गोठा नियमित स्वच्छ ठेवावा, गोठ्यात पावसाची झडप येणार नाही किंवा छतामधून पाणी गळणार नाही याची दक्षता घ्यावी.जनावरांच्या छताची डागडुजी करणे.
- गोठ्याच्या आजूबाजूला गवत किंवा झाडेझुडपे वाढू देऊ नये, असल्यास त्यांचा नायनाट करावा. माश्यांचे प्रमाण कमी होईल
- पावसाळयाच्या सुरुवातीलाच जनावरांना कृमिनाशक औषधाची मात्रा द्यावी.जनावरांचा गोठा व आजूबाजूची जागा निर्जंतुकीकरण करावी.
- गोठा कोरडा ठेवावा, गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी जेणेकरून कासेचे आजार होणारा नाहीत.
- जनावरांना द्यावयाचे खाद्य पावसाने ओले होणार नाही याची काळजी घ्यावी.
- पावसाळयात उगवणारे गवत जनावरांना वळवून देणे त्यामुळे पाण्याचे प्रमाण कमी दिसून येते. पावसाळयात हिरव्या गवतासोबत वाळलेला कोरडा तंतुमय चारा सुद्धा खाऊ घालणेआवश्यक असते.
- कृमिपासून वाचविण्यासाठी प्रत्येक पशुपालकांनी पावसाळासुरु होण्याअगोदर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना कृमिनाशक औषधाचीमात्रा द्यावी. पावसाळा संपल्यानंतर सुद्धा वर्षभर ठराविक अंदाजपत्रकानुसारकृमिनाशक औषधे देत रहावे.
- जीवाणू तसेच विषाणूजन्य रोगाविरुद्ध लसीउपलब्ध आहेत. त्यांचे पशुवैद्यकाच्या मदतीने जनावरांमध्ये योग्यवेळी लसीकरणकरून घ्यावे. उदा. एकटांग्या, घटसर्प, तोंडखुरी, पायखुरी इत्यादी.

विविध प्रक्रियायुक्त पदार्थ

आंबा

१) आमचूर पावडर

आजकाल बाजारात आमचूर पावडर सहज उपलब्ध होते. मात्र घरच्या घरी देखील तुम्ही आमचूर पावडर बनवून वर्षभरासाठी साठवून ठेवू शकता. आमचूर पावडर बनवण्यासाठी कच्च्या कैऱ्या पातळ चिप्ससारख्या खिसून तुकडे करा. हे तुकडे कडक सुर्यप्रकाशात वाळवा. साठवणूकीसाठी पावडर करणार असालतर कैरीच्या फोडींना हळद लावून त्या नीट सुकवा. हळदीमुळे बुरशी व जंतूंचा संसर्ग होत नाही. फोडीपुरेशा सुकल्यानंतर त्याची पावडर करा व हवाबंद डब्यात साठवून ठेवा. आमचूर पावडर चटणी, भाज्या, आमटी याचबरोबर चिकन व माश्यांचे सार यासारख्या मासांहारी पदार्थांचीही चव वाढवते.

२) आंब्याचे लोणचे

साहित्य : कैऱ्या कडक व आंबट अर्धा किलो, मोहरी तेल १ वाटी, मोहरीची डाळ अर्धी वाटी, लाल तिखट अर्धी वाटी, मीठ अर्धी वाटी, मेथीची पावडर अर्धा चमचा, बडीशेप १ चमचा, हळद पाव वाटी, हिंग पावडर१ चमचा इ.

कृती : कैऱ्या धुऊन-पुसून फोडी करून घ्याव्या.त्यानंतर मीठ आणि हळद घालून दोन दिवस मुरूद्याव्यात. कढईत तेल गरम करावे. खाली उतरवून त्यात मोहरी दाणे घालून तडतडू द्यावे. नंतर त्यात हिंग,मेथी पावडर, बडीशेप, मोहरीची डाळ, घालून हलवावे. मोहरीची डाळ जरा गरम करून वाटून घ्यावी म्हणजे मसाला लोणच्याला चिकटून राहतो व लोणचे लवकर मुरते. जरा थंड झाल्यावर शेवटी तिखटघालावे. छान हलवून मसाला थंड होऊ द्यावा. मसाला पूर्णपणे गार झाल्यावर त्यात कैरीच्या फोडीमिसळून लोणचे बरणीत भरून ठेवावे. सहा महिने लोणचे टिकेल.

३) जांभळाच्या बियांपासून पावडर

जांभळाची फळे पूर्ण पिकल्यानंतर जमिनीवर पडतात व बिया खराब होतात. तसेच फळे खाल्यावर बिया टाकून दिल्या जातात.जांभळाच्या बियांची भुकटी फार गुणकारी असते. त्याकरीता गर काढल्यानंतर शिल्लक बिया स्वच्छ पाण्याने धुवून उन्हात वाळवाव्यात. त्या वाळलेल्या बिया मिक्सरमध्ये दळून भुकटी तयार करावी.या भुकटीचा वापर मधुमेही रुग्णांसाठी साखरेचे प्रमाण कमी करण्यासाठी होतो. तसेच हगवण, उलटी हेविकार दूर करण्यासाठीसुद्धा त्याचा वापर होतो. बियांपासून तयार केलेले लेप त्वचारोगांच्या उपचारासाठी वापरतात. बिया जनावरांच्या खाद्यात बियांच्या भुकटीचा वापर करतात.

३) शेवग्याच्या पानांची खमंग चटणी

साहित्य:१ कप शेवग्याची हिरवी पाने, १/४ कप भाजलेलं खोबरं,१ चमचा तेल, २ चमचा लाल तिखट, १ चमचागूळ किंवा साखर, १ चमचा भाजलेले तीळ, १/४ चमचा जिरे,१ चमचा आमचूर पावडर, चवीपुरते मीठ

कृती:तेल गरम करून त्यात शेवग्याची हिरवी पाने परतावीत. आच मंद ठेवावी. भाजलेले खोबरे घालून थोडावेळ मंद आचेवर परतावे. मिश्रण थंड होवू द्यावे. त्यात भाजलेले तीळ, जिरे,आमचूर पावडर, चवीपुरते मीठतिखट, गूळ/ साखर आणि थोडे मीठ घालून मिक्सरमध्ये भरडसर बारीक करावे. तयार झालेली चटणीगरम गरम भाकरी किंवा चपाती सोबत खाऊ शकतो.

३) शेवग्याच्या पानांचा चहा

साहित्य: 1 छोटा चमचा शेवग्या शेवग्याची वाळलेली पाने, १ छोटा चमचा साखर, अर्धा चमचा लिंबूरस

कृती: शेवग्याची पाने तोडून स्वच्छ धुऊन घ्यावीत. पाने सावलीत वाळवून घ्यावी.चहाच्या डब्यामध्ये व्यवस्थित ठेवून द्यावे. एका भांड्यात पाणी गरम करून शेवग्याची वाळलेली पानेसाखर मिसळून उकळून घ्यावे. चहा गाळल्यानंतर त्यात लिंबू रस मिसळून प्यावे.







Innovative Farmers Meet 2020

(कृषक नवोत्थान २०२०)

श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र, कणेरी, कोल्हापूरने ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी, २०२० दरम्यान देशभरतील शेतकरी व शास्त्राज्ञांसाठी तीन दिवसीय नाविन्यपूर्ण शेतकरी संमेलनाचे आयोजन केले होते. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र, कणेरीचे चेरमन

प.पु.अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी उपस्थित होते.कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी डॉ. ए. के. सिंह (उप-महानिर्देशक, कृषी प्रसार भा.कृ.अनु.प., नवी दिल्ली) उपस्थित होते. तसेच इतर अतिथी डॉ. एम. बी. चेट्टी (कुलगुरू, यु.ए.एस.-धारवाड), डॉ. के .पी.

विश्वनाथा(कुलगुरू, एम.पी.के.व्ही, राहुरी), डॉ. लाखन सिंह (निर्देशक भा.कृ.अनु.प.-कृषि प्रौद्योगिकी अनुप्रयोग अनुसंधान संस्थान-पुणे), डॉ. जे.पी.शर्मा(संयुक्त निर्देशक, आय.ए.आर.आय-नवी दिल्ली), डॉ. एस.ए.पाटील(माजी निर्देशक आय.ए.आर.आय-नवी दिल्ली) व कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी व सलग्न विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रविंद्र सिंह (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, कणेरी) यांनी केले. संमेलनासाठी देशभरतील एकूण १५ राज्यांचे १४५ प्रयोगशील शेतकरी व शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. सदर कार्यक्रमात १०० हून अधिक प्रयोगशील शेतकऱ्यांनी त्यांचे नवनवीन प्रयोग इतर सहभागींना सविस्तर सांगितले. देशभरातील एकूण २१५८ शेतकऱ्यांनी सदर संमेलनाचा लाभ घेतला.

Publications





Social Media

केव्हीके टीम

डॉ. रविंद्र सिंह
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

श्री. पांडुरंग काळे
विषय विशेषज्ञ, कृषी विद्या

श्री. राजेंद्र वावरे
विषय विशेषज्ञ, मृदा शास्त्र

कु. प्रतिभा ठोंबरे
विषय विशेषज्ञ, गृह विज्ञान

श्री. चंद्रकांत धान्डोरे
विषय विशेषज्ञ, पशुवैद्यकी

डॉ. पराग तुरखडे
विषय विशेषज्ञ, पिक संरक्षण

श्री . सुनील कुमार
विषय विशेषज्ञ, कृषी विस्तार